नि.सी-६

**विलंब अर्ज (पीजीए) क01/2018**

**उलटतपास सामनेवाले यांचेतर्फे श्री. आसनिकर वकील......**

मी सेवा निवृत्त आहे. या केसमध्ये साक्ष देण्यासाठी मला वेगळे अधिकारपत्र दिलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्या पूर्वीचे अधिकार कंटीन्यु केलेले आहेत. पूर्वीचे अधिकार कंटीन्यु केल्याबद्दल कागदपत्र मी रेकॉर्डला दाखल केले नाही. माझ्या अर्जात दि. १७.२.२०१८ ही तारीख टायपिंग मिस्टेक असेल. शपथपत्रामध्ये परिच्छेद १ मध्ये लिहिलेले दस्ताऐवज मी रेकॉर्डला दाखल केले नाही. मी कोणकोणती कागदपत्रे बघितले होते हे आज मला सांगता येणार नाही. उपदानाचा अर्ज पेंडीग असताना आमच्यातर्फे प्रतिनिधी हजर राहत होता. त्यावेळेस उपदानाच्या रक्कमेचा तपशील तयार करण्यात आला होता. त्यावरुन अंदाजे किती रक्कम दयावी लागेल त्याचा अंदाज आम्हांला होता. ग्रज्युटीचा आदेश झाला त्यादिवशी आमचा प्रतिनिधी असिस्टंट कमिशनर ऑफ लेबर ऑफिसला हजर नव्हता. लेबर ऑफिस कार्यालयाने आदेशाची प्रत आम्हांला दि. ७.२.२०१८ पाठविली. साक्षीदार स्वतहून सांगतो ती आम्हांला दि. २०.२.२०१८ रोजी प्रत मिळाली. त्यानंतर त्या आदेशाची प्रत आम्ही पुन्हा मागितली नाही. ती प्रत आम्हांला मळ्यावर मिळाली होती. आदेशाची प्रत मिळाल्यावर अपील करावे लागेल अशी नोट मी मुख्यालयास पाठविली नाही. फक्त प्रत माहितीसाठी पाठविली. ती प्रत मी दि. २४.२.२०१८ रोजी मुख्यालयाला माहितीसाठी पाठविली. त्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अपील करण्याचा निर्णय एम.डी. यांनी घेतला होता. त्यासाठी एम.डी.ने ॲप्रोव्हल घेतले होते की नाही याची मला माहिती नाही. कोर्टात ग्रज्युटीचे पैसे एम.

INDUSTRIAL COURT

डी.च्या सहीने जमा केले. शेती महामंडळाला शासनाकडून अनुदान मिळत नाही. उपदानाची किती रक्कम दयावी लागेल याची मी व्यक्तिशः शहानिशा केली नाही.

अर्जामध्ये विलंबाचा कालावधी हा अपीलाच्या मुदतीनंतर झालेला आहे. शासनाकडून मान्यतेस उशीर लागला हेच उशिराचे मुख्य कारण आहे. शासनाला मान्यता कधी मागितली व शासनाकडून मान्यता कधी मिळाली याच्या तारखा मला सांगता येणार नाही. त्याबद्दलचा पत्रव्यवहार सुध्दा मी रेकॉर्डला दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जामधील विलंबाचे मी दिलेले कारण खोटे आहे. अर्जदाराने दि. २.३. २०१८ रोजी उपदानाची रक्कम देण्याबद्दल विनंती केली होती का हे मला सांगता येणार नाही. अर्जदाराच्या पत्राला आम्ही अपील करणार आहोत असा खुलासा अर्ज दिलेला नव्हता. साक्षीदार पुन्हा सांगतो की तसा खुलासा केला की नाही हे मला माहीत नाही. अपील करण्यासंदर्भात संचालक मंडळाची मिटींग कधी झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

फेरतपास काही नाही.

सही/-
( ब.रा. गुप्ता )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय,अहमदनगर.

अहमदनगर
दिनांकः १६/०९/२०१९

INDUSTRIAL COURT